PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 2

# धर्म म्हणजे काय ?

**वळवी विश्वास गोरखनाथ**
संशोधक विद्यार्थी,
इतिहास विभाग, सामाजिक शास्त्रे प्रशाळा,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
महाराष्ट्र भारत

## प्रस्तावना :-

धर्माची उत्पत्ती ही मानवाच्या सामाजिक मुल्यातुन निर्माण झाली. सुरुवातीला मानवाच्या वेगवेगळ्या टोळ्या निर्माण झाल्या. प्रत्येक टोळीने स्वत:चे नियम, तत्वज्ञान, देव निर्माण केले. त्यातुनच धर्माची आणि धर्मग्रंथांची उत्पत्ती झाली. "संस्कृत भाषेत असे काही शब्द आहेत की त्याचा यथातथ्य अनुवाद दुसज्या कोणत्याही भाषेत करणे शक्य होत नाही. 'धर्म' हा अशापौकी एक शब्द आहे. त्या शब्दाच्या अर्थाची अनेक परिवर्तने झाली आहेत. ऋग्वेदामधील सुक्तामध्ये तो शब्द किमान 56 वेळा आला असुन सामान्यत: 'धर्मन' ह्या नपुंसकलिंगी रुपात विशेषण अथवा नाम म्हणुन योजलेला आढळतो... धृ = धारण करणे, आधार देणे, पोषण करणे ह्या धातुपासुन बनला आहे, ही गोष्ट स्पष्ट आहे."1

मनुष्याला मोक्षाच्या मार्गावर वेदाची शिकवण ही आधारशिला आहे. वेदाचे ज्ञान धारण केल्याने मनुष्याला अध्यात्मिक जीवनाची अनुभूती होते. तसेच मोक्षाचा मार्ग सापडतो. यालाच 'धर्मन' असे म्हटले जाते.

**ख्रिस्ती धर्माची आधारस्थाने :- ख्रिस्त्री**

ख्रिस्ती धर्माचा उदय म्हणजे इतिहासाचे पुनर्विलोकन होय. कारण यहुदी धर्म ज्याचा इतिहास चार हजार वर्षे मागे जातो, तो समजल्यावर असे निदर्शनास येते की, प्रभु येशु हा

PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 2

जणु भविष्यात यहुद्यांचा राजा, यहुदी राष्ट्राचा निर्माता, देवाचे राज्य प्रकट करणारा आणि सर्व जगाच्या पापक्षालनासाठी आहुती देणारा असा भविष्यसुचक इतिहास यहुदी धर्मात आढळतो. त्याचबरोबर प्रभु येशुचे जीवन देखील यहुदी धर्मतत्वावर आधारलेले होते. यहुदी धर्मग्रंथात म्हटल्याप्रमाणेच, प्रभु येशुचा जन्म, जीवनकार्य आणि मृत्यू या सर्व घटना क्रमानुसार घडतांना दिसतात. प्रभु येशुने त्याचा परिचय देतांना यहुदी लोकांना सांगितले की, मीच तो भविष्यसुचक भविष्यसुचक आहे. ज्याची तुम्ही वाट पाहत होता आणि आता तुम्हाला नियमशास्त्राची गरज भासणार नाही. कारण मी स्वत: तुम्हासमोर प्रकट झालो आहे.

ख्रिस्ती धर्माची पाश्र्वभूमी समजण्याअगोदर यहुदी धर्म आणि इस्त्राएली राष्ट्राची पाळेमुळे समजणे गरजेचे आहे. धर्म म्हणजे काय हे समजल्यावर ख्रिस्ती धर्म म्हणजे काय, हे समजण्यास मदत होते. पुढे प्रभु येशुच्या बारा प्रेषितांनी जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन प्रभु येशुची शिकवण सांगितली त्यातुनच ख्रिस्ती धर्मातील सर्वोच्च मठ म्हणजे मंडळी (चर्च) चा उदय झाला. काळाबरोबरच या मंडळींत पापांची अनेक कृत्ये होऊ लागली. त्याची वाचा फोडण्यासाठी वेगवेगळ्या मंडळींचे इतिहासकार उदयास आले. पुढे याच इतिहासकारांच्या लिखानातुन प्रेरणा घेवुन मार्टीन ल्युथर याने धर्मसुधारणा चळवळ सुरु केली. त्याचा परिणाम आधुनिक मिशनरी चळवळीच्या उदयात झाला. याच चळवळीमुळे मंडळी (चर्च) आज सर्वोच्च स्थानावर उभी आहे.

**धर्माच्या विविध व्याख्या :-**

(1) "निरपेक्ष विश्वासार्हतेची मनोभावना, निरपेक्ष म्हणजे तुलनात्मकदृष्ट्या सापेक्ष विश्वासार्हतेपेक्षा जास्त." - फ्रेडरीक शेल्मेश

(2) "अभिव्यक्तीचा उत्साही मनोविष्कार." - विल्यम जेम्स

(3) "भय व संमोहन यांचे अद्वितीय मीलन म्हणजे धर्म." - ओटो

(4) "अलौकिक शक्तीबाबतची मानवी अभिवृत्ती म्हणजे धर्म होय." - ऑगबर्न

(5) "मानवापेक्षा श्रेष्ठ अशा शक्तीची आराधना म्हणजे धर्म होय." - सर जेम्स फ्रेझर""2

सर जेम्स फ्रेझर म्हणतात, मानवापेक्षाही श्रेष्ठ अशी नौसर्गिक शक्ती आहे आणि या शक्तीचा अनुभव ज्या लोकांना होता, ते त्या शक्तीची देव म्हणुन आराधना करतात तसेच ओटोचे म्हणणे आहे की, मानवाला जेव्हा असुरक्षिततेची भावना निर्माण होते, तेव्हा त्याची परिनिती संमोहनात होऊन धर्माची उत्पत्ती करते. तसेच स्पिनोझाने आपल्या 'शासनसंस्था

आणि धर्म' या पुस्तकात म्हटले आहे की, "धर्मशास्त्रे वस्तुचे कार्यकारणभाव दाखवून समजवुन देत नाहीत तर ज्यायोगे मनुष्याचे हृदये हलतील, उचंबळतील अशा रितीने व पध्दतीने ते सांगत असतात... त्यांचा हेतु बुध्दीला पटविणे हा नसतो. लोकांच्या कल्पनाशक्तीला पकडुन ठेवणे, ती आकर्षित करणे एवढाच त्यांचा हेतु असतो. म्हणुन ते नाना चमत्कार व पुन:पुन्हा ईश्वराचे येणे व डोकवणे, चमत्कार केले, अपूर्व गोष्टी घडल्या कि बहुजन समाजाला ईश्वर तो सर्वशक्तिमान आहे, असे खात्रीपूर्वक वाटते."3 स्पिनोझाचे स्पष्ट म्हणणे आहे की, धर्म म्हणजे मानसाच्या कल्पनाशक्तीला पकडुन त्याला हृदयाला देव आहे, हे पटवून त्याची आर्थिक पिळवणूक करणे. शोपेन हॉवर लिहीतो, "धर्मपंडितांचा शेवटचा मुद्दा म्हणजे विरुध्द लोकांना जिवंत जाळणे असे तो म्हणतो, धर्म म्हणजे आम जनतेचे तत्वज्ञान. असे तो धर्माचे वर्णन करीत असे... सर्व धर्मात एक प्रकारचा रुपात्मक भाग असतो. ही गोष्ट बुध्दीवादी व अंधश्रध्दावादी लोक विसरतात म्हणुन त्यांच्यामध्ये सतत भांडणे होतात व तिही विकोपास जातात."4 धर्मपंडीत आम जनतेचे तत्वज्ञान जाणुन असतात, त्यामुळे सामान्य माणसाला जिवनाच्या आनंदासाठी लहान-लहान अध्यात्मिक तत्वाचा आधार धर्मपंडीत देत असतात आणि त्यांना अंधश्रध्देत गुरफटून ठेवत असतात, म्हणुन कार्ल माक्र्स म्हणतो, "धर्म म्हणजे लोकांसाठी अफुची गोळी."5 धर्मसत्ता लोकांना सामाजिक आणि आर्थिक हक्कातुन वंचित ठेवते. ठेवते. तसेच धर्माच्या नावावर उच्चवर्गीय समाज निम्नवर्गीय समाजाची आर्थिक पिळवणूक करत असतो, त्यामुळे सामाजिक वादाबरोबरच धार्मिकवाद उद्भवतात, म्हणुन माक्र्स धर्माचा विरोध करतो.

**वौदिक धर्माची आधारस्थाने :-**

वेदिक धर्मात प्रामुख्याने "मनुस्मृतीमध्ये धर्माची पाच आधारस्थाने सांगितली आहे. धर्माचा सर्वात श्रेष्ठ आधार संपुर्ण वेद होय. त्याच्या खालोखाल ज्यांना वेदाचे ज्ञान आहे, अशा लोकांची परंपरा आणि आचार हे धर्माचे आधार असतात. त्यांच्यानंतर सदाचार संपन्न लोकांची लोकांची रुढी हा धर्माचा आधार असतो आणि शेवटी स्वत:च्या मनाचा संतोष हा धर्माचा आधार असतो."6 कोणत्याही धर्माचा पहिला आधार हा त्या धर्माचा धर्मग्रंथ होय. (उदा. बायबल, गीता, कुराण) त्यानंतर या धर्मग्रंथाचे ज्ञान ज्या लोकांना प्राप्त झालेले आहे. त्याची परंपरा त्यांच्या खालोखाल धर्मग्रंथाचे ज्ञान प्राप्त करुन ज्यांनी समाजात सदाचारसंपन्न

जिवनाचे नियम निर्माण केले आणि शेवटी स्वत:चा कर्मसंतोषावर ज्यांनी मोक्ष प्राप्त केला तो धर्म.

**धर्मनिरपेक्षवाद आणि इहवाद :-**

भारतीय राज्यघटनेने इहवादाचा पुरस्कार केलेला आहे. डॉ.राधाकृष्णन म्हणतात, "भारत स्वत:ला धर्मनिरपेक्ष म्हणवतो, याचा अर्थ असा नाही की, अदृश्य दैवी शक्तीचे अस्तित्व आपण नाकारतो... भारतीय परंपरेत देवावरील श्रध्दा हे जीवनाचे एक मुलभूत तत्व मानले गेले आहे. तथापी भारतीय राज्य कोणत्याही एका धर्माच्या लोकांचे म्हणुन राहणार नाही. कोणत्याही एका धर्माला आम्ही अग्रता देणार नाही किंवा धर्मा-धर्मामध्ये आपपरभाव दाखवणार नाही."7

भारतीय राज्यघटना कोणत्याही एका धर्माला प्राधान्य न देता सर्व धर्मांला समान धार्मिक स्वातंत्र्य देते, कारण भारतीय परंपरेने देवावरील श्रध्दा हे मुलभूत तत्व मानले आहे. असे डॉ.राधाकृष्णन म्हणतात. तसेच "श्री.एम.सी.सेटलवाड हे प्रख्यात कायदेपंडीत होते. 'इंडीया ॲज अ सिक्युलर स्टेट' या आपल्या छोट¶ाशा पुस्तिकेत ते म्हणतात, जीवनातील सर्व बाबींचा विचार व व्यवहार केवळ ऐहिक विचारांनी करणे धर्माचा अगर श्रध्देचा किंवा रुढीचा विचार त्यात येऊ न देणे आणि अध्यात्मिक प्राप्तीच्या बाबीपुरतेच धर्माचे क्षेत्र मर्यादित ठेवणे, याचंच नाव इहवाद (secularism) असे आहे."8 श्री.एम.जी.सेटलवाड म्हणतात, जीवनातील व्यवहार आणि ऐहिक बाबींमध्ये धर्माचा हस्तक्षेप होऊ नये तर अध्यात्मिक बाबींपुरते धर्माला मर्यादित ठेवणे म्हणजे ईहवाद होय. धर्मनिरपेक्षतवादाची व्याख्या बरोबर भारतीय राज्यघटनेने धार्मिक स्वातंत्र्याच्या बाबतीत काही कलमे दिलेली आहेत. ती पुढीलप्रमाणे :

**धार्मिक स्वातंत्र्याची कलमे :-**

भारतीय राज्यघटनेने प्रत्येक धर्माला कलम 25 ते 28 अंतर्गत धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार दिलेला आहे. "आपल्या घटनेच्या 25(1) कलमाप्रमाणे धर्माचा आचार-प्रचार करण्याची प्रत्येकाला पूर्ण मोकळीक दिलेली आहे. त्याचप्रमाणे ज्याचा कोणत्याही धर्मावर विश्वास नाही, त्याच्या अविश्वासाचा प्रचार करण्यासही मोकळीक आहे. पण सार्वजनिक सुव्यवस्था, आरोग्य आणि निती यांच्या अधीन राहुन प्रत्येकाने आपापले आचरण करावे."9 भारतीय राज्यघटनेने धार्मिक स्वातंत्र्याबरोबर धर्माचे आचरण पाळत असतांना राज्यव्यवस्थेला धोका पोहचणार

नाही, याची काळजी घ्यायला लावली आहे. कारण युरोपात धर्मसत्ता विरुध्द राज्यसत्ता असा फार मोठा सत्तासंघर्ष झालेला होता, याची जाणीव भारतीय घटनाकारांना आहे. एकंदरीत धर्माला स्वत:ची संस्था तसेच पंथ चालविण्याची मुभा आहे. प्रतयेक धर्माला त्याचे सण-उत्सव उत्सव तसेच धार्मिक आचरण करण्यास कायद्याने परवानगी आहे.

## संदर्भ ग्रंथसूची :-


1) धर्मशास्त्राचा इतिहास पुर्वाध, म.म.डॉ.काने, अनु. यशवंत आबाजी भट, महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ, पुणे, पहिली आवृत्ती, वर्ष 1967, पृष्ठ क्र. 23.
2) भुगोलाची मुलतत्वे - खंड 2, ए.बी.सवदी, पी.एस.कोळेकर, निराली प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, वर्ष 2010, पृष्ठ क्र. 16:18.
3) पाश्चिमात्य तत्वज्ञानाची कहानी, साने गुरुजी, खंड 42, वर्धा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, वर्ष 2011, पृष्ठ क्र. 178.
4) उपरोक्त पृष्ठ क्र. 363.
5) महाराष्ट्रातील प्रबोधन आणि वर्गजाती प्रभुत्व, उमेश बगाळे, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, वर्ष 26 जानेवारी, 2006, पृष्ठ क्र. 11.
6) धर्मशास्त्राचा इतिहास पुर्वाध, म.म.डॉ.काने, अनु. यशवंत आबाजी भट, महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ, पुणे, पहिली आवृत्ती, वर्ष 1967, पृष्ठ क्र. 26.
7) धर्मनिरपेक्षता नव्हे ईहवाद, म.स.ढोले, महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ, पुणे, पहिली आवृत्ती, वर्ष मार्च 1992, पृष्ठ क्र. 21.
8) उपरोक्त, पृष्ठ क्र. 21.
9) उपरोक्त, पृष्ठ क्र. 28.